
विकसित भारत
विकसित
महाराष्ट्र



श्री. नरेंद्र मोदी
माननीय पंतप्रधान



INDIAN RAILWAYS
भारतीय रेल

भारतीय रेल्वे

2014-2026
(31.03.2026 पर्यंत)



माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण महाराष्ट्रात बदल घडवून आणणाऱ्या व अनेक रेल्वे प्रकल्पांची पायाभरणी तसेच प्रकल्पांचे उद्घाटन आणि प्रकल्प देशाला अर्पण केले. ज्यांच्यामुळे कनेक्टिव्हिटी मजबूत होईल, प्रवाशांच्या सुखसोयी सुधारतील आणि मालवाहक क्षमतेत मोठी भर पडेल.



माननीय पंतप्रधानांनी अलिपुरद्वार – पनवेल अमृत भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवला.



देशाची गती
देशाची प्रगती



उच्चांकी भांडवली गुंतवणूक



केंद्रीय अर्थसंकल्प

आर्थिक वर्ष 2026-27

रेल्वे विकासामधून राष्ट्रविकास



रेल्वे पायाभूत सुविधा आणि संरक्षा प्रकल्पांकरीता व्यय

महाराष्ट्र

23,926
कोटी



1,171
कोटी

20x

सरासरी खर्च
2009-14

एकूण खर्च
2026-27



महाराष्ट्र: कनेक्टिव्हिटी, आधुनिकीकरण आणि जनसेवा यांच्यामार्फत वाढीला चालना

राजीव श्रीवास्तव
मध्य रेल्वे, महाव्यवस्थापक

एप्रिल 1853 मध्ये भारतातील पहिला रेल्वे प्रवास मुंबईयेथून सुरू झाला, तेव्हापासूनच रेल्वेने राष्ट्राच्या प्रगतीमध्ये आमूलाग्र भूमिका निभावली आहे. महाराष्ट्रासाठी हा वारसा विशेष महत्वाचा आहे, कारण महाराष्ट्र राज्य आजही भारताच्या रेल्वे जाळ्याचा एक मजबूत स्तंभ आहे. पायाभूत सुविधांचे 6,456 रेल्वे रूट किलोमीटर क्षेत्र व्यापणारे विस्तृत क्षेत्र असलेला महाराष्ट्र हे एक अत्यंत महत्वाचे मध्यवर्ती राज्य, उद्योगधंदे, बंदरे, शेतीप्रधान प्रदेश आणि प्रमुख शहरी केंद्रांना अजून एकमेकांशी जोडले असून, यामुळे सर्वसमावेशक सामाजिक-आर्थिक वाढ शक्य होत आहे.

या चौकटीत मध्य रेल्वे वाहतूक, नावीन्यपूर्णता आणि विकास यांना उत्तेजन देत आहे. 2025 हे वर्ष खास उल्लेखनीय अध्याय घेऊन आले, ज्यामध्ये प्रवासी सेवा, पायाभूत सेवांचा विस्तार, सुरक्षिततेतील सुधारणा आणि रे पर्यावरणपोषक उपक्रम यांचा समावेश असून या सर्व गोष्टी महाराष्ट्रातील रेल्वे प्रवास यामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सुसंगत केलेल्या आहेत.

भारत सरकारने महाराष्ट्रातील रेल्वे सेवा आणि पायाभूत सुविधा सुधारण्यासाठीच्या आपल्या निश्चयाचा पुनरुच्चार केला आहे. या वेळेस संपूर्ण राज्यामध्ये 1,65,899 कोटी रुपयांची रेल्वेची कामे प्रगतीपथावर आहेत, जे अलिकडच्या काही वर्षांमधील पायाभूत सुविधांना देण्यात आलेले एक सर्वात मोठे उत्तेजन आहे. अलिकडच्या अंदाजपत्रकामध्ये महाराष्ट्राला 23,926 कोटी एवढी उच्चांकी रक्कमचे वाटप करण्यात आले आहे, जिचा उद्देश हा क्षमता सुधारणे, सुरक्षितता सुधारणे आणि प्रवाशांची सोय सुधारणे यांना गती देण्याचा आहे.

आधुनिकीकरणाच्या दिशेने एक मोठे पाऊल म्हणजे 132 रेल्वे स्थानकांचे पुनःनिर्माण करून त्यांना जागतिक दर्जाच्या सुविधा बनवणे, यात सुधारलेल्या सुखसोयी, संपर्कक्षमता वैशिष्ट्ये आणि प्रवाशांसाठी आधुनिक इंटरफेसेस समाविष्ट असतील. या पुनर्निर्मितींमुळे ही स्थानके एकत्रिकृत वाहतुक केंद्रांमध्ये रुपांतरित होतील, ज्यामुळे महाराष्ट्रभरात शहरी प्रगतीला हातभार लागेल.

तसेच महाराष्ट्र राज्य आता आधुनिक रेल्वे सेवांमध्ये आघाडीवर आले आहे. जागतिक दर्जाच्या भारतामध्ये निर्मित 12 वंदे भारत तसेच 5 अमृत भारत एक्सप्रेस महाराष्ट्रात चालत आहेत आणि त्या अधिक वेगवान, आरामदायक आणि ऊर्जा बचत करणारा प्रवास पुरवत आहेत. या सेमी-हाय-स्पीड रेल्वे गाड्या भारताच्या तंत्रज्ञानविषयक स्वयंपूर्णतेचे प्रतिनिधित्व करतात. तसेच राज्यातील व बाहेरच्या प्रमुख शहरांदरम्यान कनेक्टिव्हिटी सुधारतात.

उपनगरांमधील वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी नेरुळ/बेलापूर उरण मार्गावर दोन नवीन स्थानके - तारघर आणि गव्हाण निर्माण करण्यात आली. यामुळे विकसित होत असलेल्या निवासी आणि औद्योगिक क्षेत्रांमधील कनेक्टिव्हिटी सुधारली आणि नवीन निर्माण होत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ भागांशी संपर्क दृढ झाला. अनेक नवीन रेल्वे सेवांनी महाराष्ट्रील रेल्वेच्या जाळ्याला आणखी मजबुती दिली, यात पुणे-अजनी वंदे भारत एक्सप्रेस, जालना – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई वंदे भारत एक्सप्रेस नांदेड पर्यंत विस्तार, जोधपूर पुणे एक्सप्रेस आणि इतर क्षेत्रीय सेवा समाविष्ट आहेत, ज्यामुळे अधिक वेगवान व सक्षम प्रवासावरील सातत्यपूर्ण भर दिला जात असल्याचे स्पष्ट होते.

2025 मध्ये पायाभूत सुविधा विकास हा खास लक्ष देण्याचा एक मोठा मुद्दा होता. 9.45 किमी च्या शिंदवणे-अंबाले घाट विभागात रेल्वे वाहतुक चालू करण्यात आल्यामुळे पुणे-मिरज हा डबलिंग प्रकल्प पूर्ण झाला असून एक महत्वाच्या मार्गावरील क्षमता वाढली. अमळनेर-बीड रेल्वे मार्गामुळे पूर्वीपासून दुर्लक्षित भागामध्ये रेल्वे कनेक्टिव्हिटी आली आणि क्षेत्रीय विकासाच्या नवीन संधी निर्माण झाल्या. दौंड-सोलापूर-वाडी विभागाची सुधारणा करून वेगमर्यादा ताशी 130 किमी पर्यंत वाढवण्यात आली. याचा फायदा अनेक रेल्वे सेवांना झाला त्याच वेळी आधुनिक रूट रीले इंटरलॉकिंग सिस्टिम्स आणि आधुनिक यार्ड विकास कामामुळे कार्यातील सुरक्षितता आणि विश्वासार्हता आणखी सुधारली.

तसेच रेल्वेने मध्य रेल्वेच्या सर्व पाचही विभागांमध्ये 'कवच' या चाचण्या पूर्ण करून मोठे यश मिळवले आणि देशांतर्गत बनावटीचे संरक्षा तंत्र स्वीकारून आपली आघाडी आणखी बळकट केली.

भविष्यकाळात डोकावून पाहिले, तर महाराष्ट्राच्या रेल्वे परिदृश्यामध्ये आणखी रुपांतर करण्यासाठी अनेक प्रकल्प रांगेत उभे आहेत. महत्वाच्या नवीन प्रकल्पांमध्ये जळगाव-जालना नवीन मार्ग, वर्धा - नांदेड नवीन मार्ग आणि मनमाड-इंदौर नवीन मार्ग यामुळे प्रादेशिक कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होईल आणि संपूर्ण राज्यातील व राज्याबाहेरील संलग्न प्रदेशांमधील आर्थिक प्रदेशांना सहाय्य होईल. मनमाड-जळगाव चौथा मार्ग आणि भुसावळ-खंडवा तिसरा व चौथा मार्ग या क्षमता वाढवणाऱ्या प्रकल्पाचा उद्देश अतिमहत्वाच्या मार्गावर मालवाहतूक आणि प्रवासी वाहतूक वाढवणे हा आहे. गोंदिया-बल्हारशाह दुहेरीकरण प्रकल्प पूर्व-पश्चिम कनेक्टिव्हिटी आणि कार्यातील कार्यक्षमता लक्षणीयरीत्या सुधारेल. याशिवाय भारतातील हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर मुंबई व अहमदाबाद वेगाने प्रगती करत आहे. दोन नवीन हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद अलिकडच्याच अंदाजपत्रकात आले आहेत. प्रगत रेल्वे यामुळे प्रवास आणि आधुनिक पायाभूत सुविधा यांचे महाराष्ट्रात आगमन होण्याचे संकेत मिळत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे वंदे मातरम च्या 150व्या वर्धापन दिनी महाराष्ट्रातील समृद्ध वारसा प्रदर्शन आणि अनेक ठिकाणी स्टेशन महोत्सवांद्वारे साजरा करण्यात आला. उत्तम प्रभाव पडण्याकरिता प्रवासी कल्याण उपक्रम सातत्याने रबावण्यात आले. ऑपरेशन नन्हे फरिश्ते मध्ये रेल्वे सुरक्षा दलाने 1,499 बालकांची सुटका केली, तर ऑपरेशन जीवन रक्षक अंतर्गत 69 लोकांचे जीव वाचवण्यात आले.

वारशापासून हाय-स्पीड नावीन्यपूर्णतपर्यंत, प्रवाशांसाठी आरामदायकतेपासून पर्यावरणपूरकतेपर्यंत महाराष्ट्राच्या रेल्वे प्रवासात दूरदृष्टी आणि ती प्रत्यक्षात आणण्याचे काम यांच्यात एक सहयोग दिसून येतो. जसे राज्य प्रगती करत आहे, तशी मध्य रेल्वे जागतिक दर्जाच्या सेवा, विकासाला सहाय्य, आणि लक्षावधी लोकांना परस्परांशी सुरक्षितता, कार्यक्षमता आणि समर्पण भावनेने जोडण्याशी वचनबद्ध आहे.

मुंबई – अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे कॉरिडॉर - (MAHSR)

महाराष्ट्रातील बुलेट ट्रेन प्रकल्प



मुंबई बुलेट ट्रेन स्थानकावरील बांधकाम चालू आहे

भारतातील पहिला बुलेट ट्रेन प्रकल्प, मुंबई – अहमदाबाद हाय स्पीड रेल कॉरिडॉर (MAHSR), ज्याची एकूण लांबी 508 किलोमीटर आहे. यामुळे पश्चिम भारतातील महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांदरम्यान कनेक्टिव्हिटी वेगवान होईल.

महत्वाच्या ठिकाणी स्थित असलेली 12 स्थानके, गुजरातमध्ये आठ (08) (साबरमती, अहमदाबाद, आणंद, वडोदरा, भरुच, सुरत, बिलिमोरा आणि वापी) आणि महाराष्ट्रात चार (04) महाराष्ट्रात (बोईसर, विरार, ठाणे आणि मुंबई) असलेला हा प्रकल्प उत्प्रेरकासारखे काम करून अनेकविध आर्थिक प्रदेशांना एकत्र आणून एकच परिवर्तनशील अर्थव्यवस्था तयार करेल, जी प्रगती आणि कनेक्टिव्हिटी यांना गती देईल.

महाराष्ट्रातील बांधकामाचा वेगही लक्षणीय प्रमाणात वाढला आहे. स्तंभांचा पाया आणि स्तंभ उभारण्याची कामे अनेक ठिकाणी प्रगतीपथावर आहेत. मुंबई बुलेट ट्रेन स्थानकावर स्लॅब कास्टिंगचे काम सुरू आहे. बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे असलेले हे स्थानक MAHSR मार्गावरील एकमेव भूमिगत स्थानक आहे. हे स्थानक मेट्रो आणि रस्त्यांनाही जोडले जाईल.

पहिली फुल स्पॅन गर्डर डहाणू येथे यशस्वीपणे सुरू करण्यात आली आहे. फुल स्पॅन गर्डरमधून वायडॅक्ट (जलमार्गिका) काम पालघर जिल्ह्यात अनेक ठिकाणी चालू आहे. ठाणे, विरार आणि बोईसर या तीनही स्थानकांचे काम वेगाने पूर्ण केले जात आहे.



मा. रेल्वेमंत्री शिळफाटा, ठाणे येथील अतिद्रुत रेल्वे बोगद्याच्या ब्रेकथ्रू जवळ

भारतातील पहिला जमीन/समुद्राखालून जाणारा 21 किमी लांबीचा बोगदा बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील मुंबई बुलेट ट्रेन स्थानक आणि महाराष्ट्रातील शिळफाटा दरम्यान बांधला जात आहे. बोगद्याच्या 21 किमी लांब कामापैकी 16 किमी लांबीचे काम टनेल बोअरिंग मशीन्स करत आहेत तर बाकीचे 5 किमी लांबीचे काम नवीन ऑस्ट्रियन टनेलिंग मेथडने (NATM) चालू आहे. यात ठाणे क्रीक येथे समुद्राखालील 7 किमी बोगदाही समाविष्ट आहे. 5 किमी NATM बोगद्याचा ब्रेकथ्रू आधीच पूर्ण झाला आहे.

महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यात सात डोंगरी बोगद्यांचे काम NATM च्या मार्गे चालू आहे. या सात डोंगरी बोगद्यांपैकी दोन बोगद्यांचे ब्रेकथ्रू यशस्वी झाले आहेत.

प्रकल्पातील वैतरणा नदीवरील सर्वात जास्त लांबीच्या पुलाचे काम खांबांच्या



पालघर, महाराष्ट्र येथे दुसऱ्या डोंगरी बोगद्याच्या ब्रेकथ्रू
दि. 3 फेब्रु 2026 रोजी यशस्वी झाले.



वैतरणा नदीवरील 2.32 किमी लांबीच्या पुलाचे काम चालू आहे.

पातळीवर आले आहे, शिवाय उल्हास व जगनी या इतर दोन मुख्य नद्यांवरील काम पायाभरणीपर्यंत आले आहे. हाच वेग अधिक मजबूत करण्यासाठी महाराष्ट्रातील ट्रॅकशी संबंधित कामांच्या कंत्राटावर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत.

पायाभूत सुविधांवर भर

नवीन रेल्वे मार्ग हा देशातील जनतेला स्वस्त आणि सुरक्षित वाहतूक उपलब्ध करून देतो. भारतभरात दीर्घ पल्ल्याचा प्रवास आणि अवजड मालाची वाहतूक सोयीची करून देतो. मालाच्या अधिक जलद वाहतुकीमुळे औद्योगिकीकरणालाही मदत होते.





विभागाचे नाव	विभागाची लांबी	कार्यान्वित केल्याचा दिनांक
1) अहमदनगर – बीड - परळी	261.25 किमी	
कार्यान्वयीत विभाग:	198.30 किमी	
a) अहमदनगर – नारायणडोह	12.27 किमी	29/03/2017
b) नारायणडोह – सोलापूरवाडी	23.26 किमी	25/02/2019
c) सोलापूरवाडी – आष्टी	30.64 किमी	31/12/2021
d) आष्टी – अमळनेर	33.92 किमी	05/01/2024
e) अमळनेर – एगनवाडी	33.12 किमी	09/08/2024
f) एगनवाडी – बीड	33.35 किमी	04/02/2025
g) बीड - वडवणी	31.74 किमी	10/12/2025 (CRS तपासणी पूर्ण)
2) बारामती – लोणंद मार्गे फलटण नवा मार्ग	64.30 किमी	
कार्यान्वयीत विभाग:	25.98 किमी	
a) लोणंद – फलटण	25.98 किमी	29/03/2017
3) बेलापूर – सीवुड्स – उरण नवा मार्ग	54.00 किमी	
प्रकल्प कार्यान्वित		
a) नेरुळ/बेलापूर – खारकोपर	24.80 किमी	11/11/2018
b) खारकोपर – उरण	29.20 किमी	14/03/2023
4) वर्धा – नांदेड यवतमाळ नवीन मार्ग मध्य रेल्वे: 77.57 किमी; रेल्वे विकास निगम लि.: 206.43 किमी	284.00 किमी	
कार्यान्वित केलेले विभाग:	38.61	
a) वर्धा – देवळी	15.00 किमी	31/08/2023
b) देवळी - कळंब	23.61 किमी	23/12/2023

प्रगतीपथावरील इतर कामे

- इंदौर - मनमाड
- पुणे – नाशिक रोड
- कराड - चिपळूण
- दिघी – जयगड बंदर (PPP)



- धुळे - नरडाणे
- कल्याण- मुरबाड
- सोलापूर – तुळजापूर - धाराशिव
- नांदेड - बिदर

पायाभूत सुविधांवर भर

दोहरीकरण

मार्गांच्या दुहेरीकरणामुळे अधिक गाडयांसाठी परिचालन सोडून क्षमता वाढते. यामुळे उद्योगाला चालना मिळून मालाची वाहतुक व प्रवासी गाडया अधिक वेगाने चालू शकतात. परिणामी शहरांमधील प्रवासाचा वेळ कमी होतो.

पुणे – मिरज सेक्शन 281.35 किमी

सेक्शनचे नाव	ब्लॉक सेक्शनची लांबी (किमी मध्ये)	सेक्शनचे नाव
शेणोली – भवानीनगर - ताकारी	13.68	30/06/2019
पुणे/घोरपडी – सासवड रोड – फुरसुंगी - आळंदी	23.22	03/02/2020
दौंडज - वाल्हा	08.52	03/11/2020
आळंदी - शिंदवणे	08.45	01/01/2021
आंबळे - राजेवाडी	04.72	03/08/2021
ताकारी - किर्लोस्करवाडी	08.46	09/07/2021
किर्लोस्करवाडी – अमणापुर - भिलवडी	13.66	31/01/2022
लोणंद – सालपा - आदर्की	16.96	03/03/2022
राजेवाडी- जेजुरी - दौंडज	20.01	18/07/2022
वाल्हा - निरा	10.17	20/10/2022
भिलवडी - नांद्रे	06.94	07/12/2022
पळशी - जरंडेश्वर	08.95	09/02/2023

सेक्शनचे नाव	ब्लॉक सेक्शनची लांबी (किमी मध्ये)	सेक्शनचे नाव
सातारा - कोरेगांव	10.90	28/02/2023
नांद्रे - सांगली	12.62	10/07/2023
निरा - लोणंद	07.62	22/10/2023
आदर्की - वाठार	10.20	31/10/2023
सांगली - मिरज + मिरज - विजयनगर (2km)	09.33	19/01/2024
तारगांव – मसुर - शिरवडे	17.85	22/02/2024
जरंडेश्वर - सातारा	07.57	31/03/2024
वाठार - पळशी	09.39	23/08/2024
शिरवडे – कराड - शेणोली	21.56	23/10/2024
शिंदवणे - आंबळे	9.45	23/10/2024
कोरेगांव - रहिमतपूर - तारगांव	21.12	06/11/2025
एकूण	281.35	

दौंड – मनमाड सेक्शन 236 किमी

सेक्शनचे नाव	ब्लॉक सेक्शनची लांबी (किमी मध्ये)	कार्यान्वित केल्याचा दिनांक
कोपरगांव – येवला	13.52	04/10/2019
येवला - अंकाई	15.23	14/09/2020
अंकाई – अंकाई किल्ला	04.48	14/02/2022
अंकाई किल्ला - मनमाड	08.63	28/06/2022
काष्टी - बेलवंडी	24.88	18/10/2022
कान्हेगांव - कोपरगांव	15.27	28/01/2023
बेलापूर - पुणतांबा	19.98	29/03/2023
पढेगांव - बेलापूर	12.42	22/07/2023
सारोळा - अकोलनेर	05.77	25/09/2023

सेक्शनचे नाव	ब्लॉक सेक्शनची लांबी (किमी मध्ये)	कार्यान्वित केल्याचा दिनांक
बेलवंडी - विसापूर	14.03	09/11/2023
निंबलक – विळद - वांबोरी	20.96	29/02/2024
पुणतांबा - कान्हेगांव	08.66	02/07/2024
पढेगांव - राहुरी	14.36	23/09/2024
राहुरी - वांबोरी	13.21	17/06/2025
अकोलनेर-अहमदनगर-निंबलक	18.81	Mar 25
दौंड - काष्टी	10.37	25/01/2026
विसापूर – रांजणगांव - सारोळा	16.2	Dec 25
एकूण	236.00	

उधना – जळगाव सेक्शन 181 किमी

सेक्शनचे नाव	ब्लॉक सेक्शनची लांबी (किमी मध्ये)	कार्यान्वित केल्याचा दिनांक
उधना – जळगांव	181	19/10/2022
एकूण	181	

घोडाणी – कळमना सेक्शन 13.04 किमी

सेक्शनचे नाव	ब्लॉक सेक्शनची लांबी (किमी मध्ये)	कार्यान्वित केल्याचा दिनांक
कळमना - नागपूर	04.84	30/11/2017
गोधनी - कळमना	08.20	20/12/2020
एकूण	13.04	

पायाभूत सुविधांवर भर

तिसरा मार्ग व चौथा मार्ग

इटारसी-नागपूर तिसरा मार्ग (126.54 किमी)

सेक्शनचे नाव	लांबी (किमी)	कार्यान्वित केल्याचा दिनांक
काटोल – कोहली	24.57	15/03/2022
नरखेड – कळंभा	15.06	24/06/2022
कळंभा – काटोल	10.05	12/11/2022
नरखेड – तीगांव	27.16	30/06/2023
कोहली – कळमेश्वर – भरतवाडा	23.04	15/03/2024
भरतवाडा - गोधणी	6.26	11/01/2025
गोधनी – नागपूर	5.4	12/06/2025
चिचोंडा – मुलताई	15	26/12/2025
एकूण	126.54	

मनमाड – जळगाव तिसरा मार्ग (159.81 किमी)

सेक्शनचे नाव	लांबी (किमी)	कार्यान्वित केल्याचा दिनांक
जळगांव – शिरसोली	11.35	27/08/2022
शिरसोली – माहेजी	20.90	27/08/2022
माहेजी – पाचोरा	15.34	27/08/2022
मनमाड - नांदगांव	25.09	24/08/2023
पिंपरखेड – चाळीसगांव	31.79	19/03/2024
चाळीसगांव – पाचोरा	44.94	05/03/2025
नांदगांव – पिंपरखेड	10.4	24/11/2025
एकूण	159.81	

वर्धा – बल्लारशा तिसरा मार्ग (123.63 किमी)

सेक्शनचे नाव	लांबी (किमी)	कार्यान्वित केल्याचा दिनांक
चितोडा – हिंगणघाट	29.35	2019-2022
सेवाग्राम – चितोडा	01.50	30/06/2023
हिंगणघाट – माजरी	16.44	19/06/2024
माजरी – चिकनी रोड	12.21	17/12/2024
माजरी – भांदक – ताडाली	19.13	10/01/2025
चिकनी रोड – वरोरा – माजरी	22.5	12/01/2026
चिकनी रोड – वरोरा	10.25	12/01/2026
वरोरा - माजरी	12.25	12/01/2026
एकूण	123.63	

वर्धा – सेवाग्राम – नागपूर 3 रा व 4 था मार्ग (123.10 किमी)

सेक्शनचे नाव	लांबी (किमी)	कार्यान्वित केल्याचा दिनांक
बुटीबोरी – सिंदी	37.02	04/10/2019
बुटीबोरी – खापरी	30.58	10/05/2023
खापरी – अजनी	18.48	16/03/2024
सिंदी – सेलू रोड	37.02	27/03/2025
एकूण	123.10	

राजनांदगांव - नागपूर (110.88 किमी)

सेक्शनचे नाव	लांबी (किमी)	कार्यान्वित केल्याचा दिनांक
तुमसर रोड – भंडारा	20.00	17/03/2022
काचेवानी – तुमसर रोड	27.12	14/09/2022
भंडारा – तारसा	24.70	27/01/2023
गंगाझरी – काचेवानी	08.46	
धनौली – आमगांव – गुदमा	20.26	16/12/2023
सालवा – कन्हान	05.80	23/02/2024
कन्हान – कामटी	04.54	23/02/2024
एकूण	**110.88**	




नांदगांव पूल मनमाड जळगांव 3 र्या ग मार्गाचा प्रकल्प

भारतातील लॉजिस्टिक्स वेगाने कार्यक्षम होत आहे. लॉजिस्टिक्सचा खर्च वित्तीय वर्ष 2023 मध्ये जीडीपीच्या 8.84 टक्के होता. तो वित्तीय वर्ष 2024 मध्ये जीडीपीच्या 7.97 टक्क्यांवर आला, असे DPIIT–NCAER यांनी केलेल्या एका संयुक्त पाहणीत दिसले आहे. संपूर्ण वाहतूक आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रामध्ये महत्वाचे राष्ट्रीय उपक्रम जसे पंतप्रधान गतिशक्ती आणि डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर हे खर्च सुयोग्य पातळीवर आणण्यास आणि कार्यातील सक्षमता यांना चालना देत आहेत. ऑक्टोबर 2025 पर्यंत 2843 किमी डीएफसी नेटवर्क पैकी सुमारे 2,741 किमी (96.4 टक्के) कार्यान्वित करण्यात आले आहेत. पूर्व डेडिकेट फ्रेट कॉरिडॉर (1,337 किमी) पूर्ण झाले आहे आणि पश्चिम डेडिकेट फ्रेट कॉरिडॉर च्या 1,506 किमी पैकी 1,404 किमी कार्यान्वित झाले आहेत. हे कॉरिडॉर प्रवासी नेटवर्कवरील गर्दी कमी करत आहेत. ज्यामुळे माल वाहतुकीला लागणारा वेळ लक्षणीय प्रमाणात कमी झाला आहे आणि विश्वासार्हता वाढली आहे, ज्यामुळे लॉजिस्टिक्सवरील खर्च कमी होत आहेत. एक अशी खर्चाच्या दृष्टीने तुल्यबळ, पूर्वानुमानयोग्य औद्योगिक पर्यावरण निर्माण करण्यातील रेल्वेची भूमिका मजबूत होत आहे, जे जागतिक मूल्य शृंखलेत भारताला स्थान मिळवून देण्यास सहाय्य करत आहे.

पायाभूत सुविधांवर भर

गेजमध्ये बदल



- केलोद – नागपूर (51 किमी)
- अकोला - अकोट (44,369 किमी) 24/07/2020 रोजी पूर्ण झाले – प्रवासी गाड्या 23/11/2022 पासून सुरु करण्यात आल्या
- पाचोरा - जामनेर (84.34 किमी)

इतर चालू असलेली कामे

रहदारीसाठी सुविधा व इतर कामे	रु. 236 कोटी
पनवेल – कळंबोली कोचिंग टर्मिनस टप्पा-I	रु. 10 कोटी
24 कोचेससाठी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई चे प्लॅटफॉर्म 12, 13 चा विस्तार	रु. 10 कोटी
24/26 कोचेससाठी पुणे फलाटाचा विस्तार	रु. 25 कोटी
रस्ते सुरक्षा कामे - रोड ओव्हर ब्रिज/रोड अंडर ब्रिज	रु. 756 कोटी
ग्राहकांसाठी सोयी-.सुविधा	रु. 1022 कोटी
ट्रॅक्सचे नूतनीकरण	रु. 1320 कोटी
पुलांची कामे, बोगद्यांची कामे	रु. 192 कोटी
संकेतकरण आणि दूरसंचार कार्ये	रु. 183 कोटी



प्रकल्पाचे काम

हाय स्पीड रेल्वे कॉरिडॉर (प्रस्तावित)



पायाभूत सुविधांवर भर



माननीय रेल्वेमंत्रीद्वारा पनवेल रेल्वे स्टेशन यार्ड रिमॉडेलिंगच्या कामांचे निरिक्षण.

रेल्वे विद्युतीकरण

- भारतीय रेल्वे जगातील सर्वात मोठी 'ग्रीन' रेल्वे बनण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहे. 2030 पर्यंत 'नेट झिरो कार्बन एमिशन्स" संपादित करणे हे रेल्वेचे उद्दिष्ट आहे.
- महाराष्ट्राने ब्रॉड गेज रेल्वे नेटवर्कचे 100% विद्युतीकरण पूर्ण केले आहे.

विद्युतीकरणाचे महत्वाचे फायदे

- पर्यावरण-पूरक आणि टिकाऊ सहाय्य
- आयात केलेल्या डिझेल इंधनावरील अवलंबित्व कमी
- कार्बन फूटप्रिंटमध्ये लक्षणीय घट
- कार्यचालन आणि देखभाल खर्च कमी
- अधिक अवजड मालगाड्या आणि लांबीने जास्त प्रवासी गाड्या वाहून नेता येतात
- इलेक्ट्रिक इंजिनांची वजनवाहक क्षमता अधिक, त्यामुळे थ्रूपुट वाढतो
- ट्रॅक्शन चेंजमुळे खोळंबून थांबावे लागत नाही त्यामुळे सेक्शनल क्षमता वाढते
- वेग आणि कामातील सक्षमतेमध्ये सुधारणा



वडवणी यार्ड येथे ब्रॅकेट ॲडजस्टमेंटचे काम



न्यू आष्टी

रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण –
एक प्रमुख उपक्रम (अमृत स्थानके)

प्रमुख स्थानकांचा पुनर्विकास/सुधारणा

- रेल्वे मंत्रालयाने देशभरातील प्रमुख स्थानकांच्या पुनर्विकासाला गती दिली आहे. देशभरातील प्रमुख स्थानकांच्या पुनर्विकासाचा अर्थव्यवस्थेवर गुणाकारात्मक परिणाम होईल कारण रोजगार वाढतील आणि आर्थिक प्रगतीत सुधारणा होईल.
- मध्य रेल्वेमध्ये या योजनेअंतर्गत एकूण 18 स्थानके पुनर्विकास/सुधारणांसाठी निवडली आहेत, त्यापैकी पुढील 17 स्थानके महाराष्ट्राच्या अधिकारक्षेत्रात येतात. **छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई, ठाणे, ठाकुर्ली, कल्याण, लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई, लोणावळा, भुसावळ, अकोला, अमरावती, नाशिक रोड, नागपूर, अजनी, वर्धा, पुणे, मिरज, शिवाजी नगर आणि साई नगर शिर्डी.**
- या स्थानकांच्या पुनर्विकासात विस्तीर्ण रूफ प्लाझा, सुविधा जसे फूड कोर्ट, प्रतीक्षालय, मुलांसाठी क्रीडांगण, स्थानिक उत्पादनांसाठी राखीव जागा इ. असतील.
- या विकासामुळे वाहतुकीचे विविध मार्ग रेल्वे स्थानकापाशी एकत्र येतील, जसे मेट्रो, बस इ. आणि शहराच्या दोन्ही बाजू स्थानकाशी जोडल्या जातील.
- स्थानकाच्या बांधकामामध्ये पर्यावरणपूरक बांधकाम तंत्रज्ञान वापरले जाईल आणि 'दिव्यांगजनां'साठीही सुविधा असतील.
- स्थानके 'इंटेलिजंट' बांधकामाच्या संकल्पनेनुसार विकसित केली जातील, त्यामध्ये प्रवाशांसाठी अद्ययावत सुविधा असतील. स्थानकाच्या पुनर्विकासात रेल्वे प्रवासे तसेच नागरिकांसाठी एक 'सिटी सेंटर' सदृश जागा निर्माण केली जाईल.
- तीन स्थानकांवर मोठ्या प्रमाणावर सुधारणांचे काम चालू आहे, म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई, नागपूर, व अजनी.



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई



नागपूर



अजनी

सिंहस्थ कुंभ मेळा 2027 साठी भारतीय रेल्वेची पूर्वतयारी
(नाशिक त्र्यंबकेश्वर क्षेत्र)

मध्य रेल्वेमार्फत भारतीय रेल्वे नाशिक त्र्यंबकेश्वर भागामध्ये 2027 मध्ये येणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात प्रचंड संख्येने येणे अपेक्षित असलेल्या भाविकांच्या सोयीसाठी, त्यांची हाताळणी सुरक्षितपणे, विनाअडथळा आणि कार्यक्षमपणे करता यावी यासाठी मोठ्या प्रमाणावर, निश्चित काळात पूर्ण होईल अशी, पायाभूत सुविधा विकासाची योजना हाती घेत आहे.

महत्वाची उद्दिष्टे

- प्रवासी सुरक्षितता, वाहतूक क्षमता आणि गर्दीचे व्यवस्थापन.
- स्थानकातील पायाभूत सुविधांमध्ये आणि कार्यचालन प्रणालींमध्ये सुधारणा.
- ट्रेन सहजतेने चालवता येण्यासाठी सिग्नलिंग, यार्डमधील आराखडे आणि सेक्शनल क्षमता यात सुधारणा.
- कुंभ मेळ्याच्या काळानंतरही नेहमीच्या रेल्वे वाहतुकीच्या फायद्यासाठी दीर्घकालीन सुधारणा.

प्रमुख पायाभूत सुविधा कामे

- प्रमुख स्थानकांवर नॉन-इंटरलॉक्ड (NI) आणि इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग (EI) कमिशनिंग मध्ये सिव्हिल, ट्रॅक, सिग्नलिंग आणि टेलिकम्युनिकेशन्स (S&T), आणि इलेक्ट्रिकल सुधारणा.
- मनमाड-इगतपुरी सेक्शनमध्ये सुरक्षितता आणि लाईन क्षमता सुधारण्यासाठी ऑटोमॅटिक ब्लॉक सिग्नलिंगची कामे.
- महत्वाच्या स्थानकांवर 15 मी पर्यंत फलाटांची रुंदी वाढवणे, यात देवळाली, नाशिक रोड आणि कसबे सुकेणे येतात.
- प्रवाशांची ये-जा सुधारण्यासाठी नाशिक रोड स्थानकावर 12 मी रुंदीचा फूट ओव्हरब्रिज.
- मुख्य कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या गर्दीच्या व्यवस्थापनासाठी विस्तीर्ण समर्पित होल्डिंग क्षेत्रांचे विकसन.
- टप्प्याटप्प्याने ट्रॅक लिंकिंग, स्टेबलिंग सुविधा, यार्ड रिमॉडेलिंग आणि OHE/TRD ही कामे करणे.

स्थानकनिहाय विकासाचे मुख्य मुद्दे

- **नाशिक रोड:** फलाटाचे रुंदीकरण, यार्ड रिमॉडेलिंग मान्यताप्राप्त FOB, आणि स्थानकाच्या इमारतीबाहेर विस्तृत होल्डिंग क्षेत्रे.
- **देवळाली:** यार्ड रिमॉडेलिंग स्टेबलिंग व तपासणी सुविधा, फलाटाचे रुंदीकरण, इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग बिल्डिंग, आणि अतिक्रमणे हटवण्याच्या मार्गाने लॅंड रेक्लमेशन.
- **ओढा:** इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग बिल्डिंग, टप्पा-II कमिशनिंग अंतर्गत ट्रॅक व OHE ची कामे, आणि समर्पित गर्दीला एका ठिकाणी ठेवण्यासाठी प्रतिक्षा जागा.
- **खेरवाडी:** फलाट व EI ची कामे, पाण्याच्या पायाभूत सुविधेत सुधारणा, आणि एकत्रिकृत गर्दी व्यवस्थापन व्यवस्था.
- **कसबे सुकेणे:** फलाटाची उंची वाढवणे, लांबी व रुंदी वाढवण्याच्या योजना, EI बांधकाम आणि लूप-लाईन सुधारणे.

संपूर्ण प्रणालीतील सुधारणा

- अनेक स्थानकांमध्ये यार्ड रिमॉडेलिंग, यात मनमाड, जळगाव आणि भुसावळ समाविष्ट. 12 स्थानकांवर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग च्या कामांची योजना.
- तीन, चार व पाच क्रमांकाच्या मार्गांसहित विकासकामांमध्ये प्रगती.

समन्वय आणि संनिरीक्षण

- महाराष्ट्राच्या अधिकाऱ्यांसोबत जमिनीचा वापर आणि रहदारी योजनेबाबत समन्वय.
- कामे वेळेवर पूर्ण होण्यासाठी नियमितपणे संनिरीक्षण आणि आंतरविभागीय पुनराभ्यास.
- मेळ्यापूर्वी साहित्याचा पुरवठा अधिक वेगाने होण्यासाठी आणि टप्प्याटप्प्याने कार्यान्वयन करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येईल.

ऑटोमॅटिक ब्लॉक सिग्नलिंग

सिंहस्थ कुंभ मेळा 2027 साठी भारतीय रेल्वे सेक्शनल क्षमता, सुरक्षितता आणि कार्यामधील क्षमता लक्षणीय प्रमाणात वाढवण्यासाठी मनमाड-इगतपुरी क्षेत्रात ऑटोमॅटिक ब्लॉक सिग्नलिंग (ABS) चे काम करत आहे. देवळाली, नाशिक रोड, ओढा, खेरवाडी व कसबे सुकेणे या महत्वाच्या स्थानकांमध्ये इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग (EI) आणि यार्ड सिग्नलिंग मधील सुधारणा हाती घेतल्या जात आहेत, ज्यामुळे अधिक जलद गाडयांची हाताळणी, अधिक सुरक्षित रूट सेटिंग आणि भाविकांची संख्या सर्वोच्च असतानाच्या काळात सुधारित गर्दी व्यवस्थापन होईल.

अपेक्षित परिणाम

या सर्व पूर्वतयारीचा उद्देश सिंहस्थ कुंभ मेळा 2027 दरम्यान येणाऱ्या, लक्षावधी भाविकांचा प्रवास सुरक्षित, कार्यक्षम आणि सन्मानाने घडवणे हा आहे, त्याच वेळी नाशिक क्षेत्रात रेल्वेची दीर्घकालीन कार्याची क्षमताही सुधारणे हाही उद्देश आहे.



खेरवाडी स्थानकामध्ये मालवाहू मार्गाच्या विस्ताराचे काम



कसबे सुकेणे स्थानकावर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग बिल्डिंगचे काम प्रगतीपथावर

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई

पुनर्विकास प्रकल्प

19/01/2023 रोजी माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई – पुनर्विकास प्रकल्पाची कोनशिला बसवली.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबईची पुनर्रचना करून तेथे आधुनिक प्रणाली आणि आगमन व निर्गमन करणाऱ्या गाड्यांसाठी वेगळ्या सोयी, लिफ्ट्स, एस्केलेटर्स आणि ट्रॅव्हलेटर्स बसवले जातील, मेट्रो लाईन क्र. 3 शी ते जोडले जाईल, संपूर्ण स्थानकादरम्यान एकाच डिझाईनची मार्गिका आणि या जागतिक स्तरावर लोकप्रिय असलेल्या बांधकाम कलाकृतीला पुन्हा तिचे पूर्ववैभव प्राप्तकरून दिले जाईल.

प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये

- **प्रकल्प खर्च: रु. 1813 कोटी**
- **स्थानकाचे आदर्श बांधकाम:** वारसा वाढवण्यासह संवर्धन करणार
- प्लॅटफॉर्मवर गर्दीसाठी खास द्विस्तरीय सबर्बन कॉन्कोर्स आणि दीर्घ अंतरासाठी कॉन्कोर्स शिवाय किरकोळ व्यापारी, कॅफेटेरिया, मनोरंजनात्मक सोयी यांच्यासाठी जागा, इमारतीच्या सर्व बाजू व सर्व प्लॅटफॉर्म एकमेकांना जोडणार.
- **येणाऱ्या लोकांसाठी फूट ओव्हरब्रिज,** स्कायवॉकशी जोडणार
- सर्व बाजूंनी स्थानक इमारतीत येण्यासाठी अनेक प्रवेशद्वारे आणि सहज प्रवेश
- **दक्षिणेकडच्या** सध्याच्या कॉन्कोर्सवरील गर्दी कमी करणे आणि पार्किंगसाठी पुरेशा सोयी.
- **प्रमाणित पर्यावरणपूरक इमारती** – सौर ऊर्जा, जलसंवर्धन/पुनर्वापर, सांडपाणी प्रक्रिया करणारी यंत्रणा, घन कचरा व्यवस्थापन.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई प्रकल्पाची सद्यस्थिती

- प्रत्यक्ष कामाची प्रगती: 19.5%
- वित्तीय प्रगती:28.36%.



विभागीय रेल्वे व्यवस्थापक मुंबई विभाग कॉम्प्लेक्स साठी स्ट्रक्चरल स्टील कॉलम्स व बीम्सची उभारणी



LD नोड कॉम्प्लेक्ससाठी रॅफ्ट फाउंडेशनचे बांधकाम

नागपूर स्थानक पुनर्विकास प्रकल्प

प्रमुख वैशिष्ट्ये

- **अंदाजित खर्च: ₹589.22 कोटी.**
- **मंजूर रक्कम:** ₹487.77 कोटी.
- **सुरुवात करण्याचा दिनांक:** 02/12/2022
- **पूर्ण करण्याची मुदत:** 36 महिने
- **पूर्ण करण्याचा उद्देशित दिनांक:** मार्च'27
- **प्रत्यक्ष खर्च:** 58%
- **वित्तीय प्रगती** - 56.29 % [रु,.274.56 कोटी.]
- दोन्ही बाजूंना **उत्तम स्थानकांचे बांधकाम**
- पश्चिम बाजूच्या वारसा इमारतीचे पुनरुज्जीवन करून तिचे वैभव पुनःस्थापित करणार
- विस्तीर्ण **रूफ प्लाझा**(108मी x 52मी फलाटाच्या वर) प्रवासी सुखसोयींसह (किरकोळ विक्री केंद्रे, कॅफेटेरिया इ.)
- येणाऱ्या गाडया व जाणाऱ्या गाड्यांचे **विलगीकरण**
- **दोन** 06मी रुंदीचे FOBs आणि उंची वाढवलेले कॉन्कोर्स क्षेत्र: 10,433 चौ मी
- **लिफ्ट्स** – 30 Nos., **एस्केलेटर्स** – 31 Nos.
- मेट्रो स्थानक, भविष्यातील शहर आणि आंतरराज्य बस, आणि इतर वाहतुक मार्गांसह **एकत्रिकरण**
- बहुस्तरीय पार्किंग सुविधांसह **विनाअडथळा रहदारी**
- दिव्यांग-**सहाय्यक संरचना**
- **आरामदायक** प्रकाशव्यवस्था, दिशा-दर्शकचिन्हे, येण्याजाण्यामध्ये सहजता, प्रतीक्षालयासाठी पुरेशी जागा आणि सोयी
- **सुरक्षा व्यवस्था उपाय:** सीसीटीव्ही, प्रवेश नियंत्रण
- **पर्यावरणपूरक इमारती,** सौर ऊर्जा आणि जलसंवर्धनासहित









अजनी स्थानक पुनर्विकास प्रकल्प

प्रमुख वैशिष्ट्ये

- **अंदाजित खर्च:** ₹353 कोटी.
- **मंजूर रक्कम:** ₹297.79 कोटी.
- **सुरुवात करण्याचा दिनांक:** 21/01/2023
- **पूर्ण करण्याची मुदत:** 40 महिने
- **पूर्ण करण्याचा उद्देशित दिनांक:** मूळ - 04/05/2026, अपेक्षित – डिसेंबर 2026
- **प्रत्यक्ष प्रगती:** 59%
- **वित्तीय प्रगती** – 55.72 % [रु.165.93 कोटी.]
- दोन्ही बाजूंना उत्तम स्थानकांचे बांधकाम
- विस्तीर्ण **रूफ प्लाझा**(72मी x 60मी फलाटाच्या वर) प्रवासी सुखसोयींसह (किरकोळ विक्री केंद्रे, कॅफेटेरिया इ.)
- येणाऱ्या गाडया व जाणाऱ्या गाड्यांचे **विलगीकरण**
- **दोन** 10मी रुंदीचे FOBs आणि 18मी रुंदीचा मध्यवर्ती FOB
- **लिफ्ट्स** – 21, **एस्केलेटर्स** – 17
- **ट्रॅव्हलेटर्स** – 6
- मेट्रो स्थानक, भविष्यातील शहर आणि आंतरराज्य बस, आणि इतर वाहतुक **मार्गांसह एकत्रिकरण**
- बहुस्तरीय पार्किंग सुविधांसह **विनाअडथळा रहदारी**
- **दिव्यांग**-सहाय्यक संरचना
- **आरामदायक** प्रकाशव्यवस्था, दिशा-दर्शकचिन्हे, येण्याजाण्यामध्ये सहजता, प्रतीक्षालयासाठी पुरेशी जागा आणि सोयी
- **सुरक्षा** व्यवस्था उपाय: सीसीटीव्ही, प्रवेश नियंत्रण
- **पर्यावरणपूरक इमारती,** सौर ऊर्जा आणि जलसंवर्धनासहित







अमृत भारत स्थानके

अमृत भारत स्थानक योजना भारतीय रेल्वेच्या स्थानकांच्या विकासासाठी हाती घेण्यात आली आहे. या योजनेच्या अंतर्गत भारतीय रेल्वेतील १३३७ स्थानकांपैकी महाराष्ट्रातील १३२ स्थानके निवडण्यात आली आहेत, यामध्ये स्थानकांचा विकास दीर्घ काळाच्या दृष्टिकोनातून होईल. यामध्ये मुख्य योजना केल्या जाऊन स्थानकांवरील सुखसोयी सुधारण्यासाठी त्या टप्प्याटप्प्याने अमलात आणल्या जातील, जसे:

- स्थानकापर्यंत येण्याच्या मार्गात सुधारणा
- लोकांच्या जाण्यायेण्यासाठी क्षेत्रे
- प्रतीक्षालये
- स्वच्छतागृहे
- गरजेनुसार लिफ्ट/एस्केलेटर्स
- स्वच्छता
- स्थानिक उत्पादनांसाठी किओस्क – एक स्थानक – एक उत्पादन
- प्रवाश्यांसाठी चांगल्या माहिती व्यवस्था
- एक्झिक्युटिव्ह लाउंज
- व्यवसायिक बैठकांसाठी खास जागा
- लॅंड्स्केपिंग
- इमारतीत सुधारणा
- शहराच्या दोन्ही बाजूंसोबत स्थानकाचे एकत्रिकरण
- बहुमार्गीय एकत्रिकरण.
- दिव्यांगजनांसाठी सुविधा
- पर्यावरणपूरक व टिकाऊ उपाय योजना
- बॅलास्ट-लेस ट्रॅक्सची सोय
- गरजेनुसार 'रूफ प्लाझा''
- भविष्यकाळात स्थानकावर नगर केंद्राची निर्मिती

महाराष्ट्रात निवडलेली 132 स्थानके अशी आहेत:

- अहिल्यानगर
- अजनी (नागपूर)
- अक्कलकोट रोड
- अकोला
- आकुर्डी
- अमळनेर
- आमगांव
- अमरावती
- अंधेरी
- बडनेरा
- बल्हारशाह
- बांद्रा टर्मिनस
- बारामती
- बेलापूर
- भंडारा रोड
- भोकर
- भुसावळ
- बोरिवली
- भायखळा
- चाळीसगांव
- चांदा फोर्ट
- चंद्रपूर
- चर्नीरोड
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई
- छत्रपती संभाजीनगर
- छत्रपती शाहू महाराज टर्मिनस, कोल्हापूर
- चिंचपोकळी
- चिंचवड
- दादर (मध्य रेल्वे)
- दादर (पश्चिम रेल्वे)
- दहिसर
- दौंड
- देहू रोड
- देवळाली
- धामणगांव
- धरणगांव
- धर्माबाद
- धाराशिव
- धुळे
- दिवा
- दुधनी
- गंगाखेड
- गोधनी
- गोंदिया
- ग्रँट रोड
- हडपसर
- हातकणंगले
- हुजूर साहिब नांदेड
- हिमायतनगर
- हिंगणघाट
- हिंगोली
- इगतपुरी
- इतवारी जं (नागपूर)
- जळगांव
- जालना
- जेऊर
- जोगेश्वरी
- कल्याण जं.
- कामटी
- कांदिवली
- कांजूर मार्ग
- कराड
- काटोल
- केडगांव
- किनवट
- कोपरगांव
- कुर्डुवाडी जं.
- कुर्ला जं.
- लासलगांव
- लातूर
- लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई
- लोणंद जं.
- लोणावळा
- लोअर परळ
- मालाड
- मलकापूर
- मनमाड जं.
- मानवत रोड
- मरीन लाईन्स
- माटुंगा
- मिरज जं.
- मुदखेड जं.
- मुंबई सेंट्रल
- मुंब्रा
- मूर्तिजापूर जं.
- नागरसोल
- नागपूर जं
- नांदगांव
- नांदुरा
- नंदुरबार
- नरखेड जं.
- नाशिक रोड
- पाचोरा जं.
- पालघर
- पंढरपूर
- पनवेल जं.
- परभणी जं.
- परळ
- परळी वैजनाथ
- परतूर
- फलटण
- प्रभादेवी
- पुलगांव जं.
- पुणे जं.
- पूर्णा जं.
- रावेर
- रोटेगांव
- साईनगर शिर्डी
- सॅंडहर्स्ट रोड
- सांगली
- सातारा
- सावदा
- सेलू
- सेवाग्राम
- शहाड
- शेगांव
- शिवाजी नगर, पुणे
- सोलापूर
- तळेगांव
- ठाकुर्ली
- ठाणे
- टिटवाळा
- तुमसर रोड
- उमरी
- उरुळी
- वडाळा रोड
- विद्याविहार
- विक्रोळी
- वडसा
- वर्धा
- वाशिम
- वाठार

महाराष्ट्रभरातील अमृत भारत स्थानके (पूर्ण झालेली)



चिंचपोकळी स्थानक



वडाळा रोड स्थानक



परळ स्थानक



शहाड स्थानक



माटुंगा स्थानक

महाराष्ट्रभरातील अमृत भारत स्थानके (प्रगतिपथावरील कामे)


सोलापूर स्थानक


भायखळा स्थानक



नांदुरा स्थानक


बारामती स्थानक


हडपसर स्थानक

मुंबई महानगर क्षेत्रातील क्षमतावृद्धीसाठी कामे





भारत सरकारने 2025-26 च्या अंदाजपत्रकात मुंबई शहर वाहतूक प्रकल्पांसाठी रु. 1777 कोटी वाटप

मुंबई शहर वाहतुक प्रकल्प (MUTP-III)

- पनवेल-कर्जत नवीन उपनगरी दुहेरी मार्ग खर्च सुमारे रु. 2,782 कोटी.
- ऐरोली-कळवा एलेव्हेटेड लिंक खर्च सुमारे रु. 476 कोटी.
- अतिक्रमण नियंत्रणाचे काम खर्च सुमारे रु. 551 कोटी.
- विरार-डहाणू उपनगरीय मार्ग (चौपदरीकरण) खर्च सुमारे रु. 3,578 कोटी.

पूर्ण झालेली कामे

- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई मधील प्लॅटफॉर्म क्र. 10, 11, 12 & 13चा विस्तार
- लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई मध्ये दोन नवीन प्लॅटफॉर्म
- कुर्ला-ठाणे दरम्यान 5वा आणि 6वा मार्ग
- ठाणे-दिवा दरम्यान 5वा आणि 6वा मार्ग

.

MUTP-III A

- गोरेगाव-बोरिवली दरम्यान हार्बर मार्गाचा विस्तार रु. 826 कोटी
- बोरिवली-विरार दरम्यान 5वा आणि 6वा मार्ग रु. 2,184 कोटी
- कल्याण आसनगांव दरम्यान 4था मार्ग रु.1,759 कोटी
- कल्याण-बदलापूर दरम्यान 3रा आणि 4था मार्ग रु.1,510 कोटी
- कल्याण यार्ड – दूर अंतराच्या व उपनगरी रहदारीचे अलगीकरण रु.866 कोटी
- 238 वातानुकुलीत ईएमयू/वंदे भारत उपनगरी रेक्सची खरेदी रु.19,293 कोटी
- रोलिंग स्टॉकसाठी देखभाल व्यवस्था रु.2,353 कोटी
- मुंबईमधील 17 उपनगरी स्थानकांमधील सुधारणा रु.947 कोटी

काम प्रगतीपथावर

- कल्याण यार्ड चे रिमॉडेलिंग
- तुर्भे येथे गती शक्ती बहुमार्गीय मालाचे टर्मिनल
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई - कुर्ला 5वा आणि 6वा मार्ग
- कल्याण-बदलापूर 3रा आणि 4था मार्ग
- कल्याण-आसनगांव 3रा आणि 4था मार्ग
- कल्याण-कसारा 3रा मार्ग
- मुंबई सेंट्रल ते बोरिवली दरम्यान 6वा मार्ग
- विरार-डहाणू रोड चौपदरीकरण
- ऐरोली-कळवा एलेव्हेटेड लिंक
- गोरेगांव -बोरिवली हार्बर लाईन विस्तार
- बोरिवली-विरार दरम्यान 5वा आणि 6वा मार्ग

MUTP-III B

- आसनगांव-कसारा 4था मार्ग रु. 871 कोटी
- बदलापूर – कर्जत 3रा आणि 4था मार्ग रु. 1,324 कोटी



पनवेल – कर्जत उपनगरीय दुहेरी मार्गाचे काम



कल्याण यार्ड रिमॉडेलिंगचे काम

मुंबई महानगर क्षेत्रातील क्षमतावृद्धीसाठी कामे

प्रमुख वैशिष्ट्ये

- स्थानके-139
- दररोज सेवा 3234 ज्यात येतात 15 डब्यांच्या सेवा (172) व वातानुकुलीत उपनगरी सेवा (239) आणि किमी-463
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई-कसारा-121 किमी
- कल्याण-खोपोली कर्जतमार्गे-60 किमी
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई-पनवेल-49 किमी
- ठाणे-वाशी ट्रान्सहार्बर लाईन - 18 किमी
- चर्चगेट-डहाणू रोड-123 किमी
- बेलापूर-सीवुड्स दारावे / नेरूळ-उरण - 39 किमी
- वडाळा रोड - गोरेगाव हार्बर लाईन - 17 किमी
- पुणे-लोणावळा -65 किमी
- मध्य रेल्वेच्या हार्बर लाईनवर 14 वातानुकुलीत उपनगरी सेवा सामील करण्यात आल्या.
- मध्य रेल्वेच्या BSU पोर्ट लाईनमध्ये 10 अतिरिक्त उपनगरी सेवा सामील करण्यात आल्या.
- पश्चिम रेल्वेच्या मुंबईच्या उपनगरी नेटवर्कमध्ये 4 वातानुकुलीत उपनगरी सेवा सामील करण्यात आल्या.
- पश्चिम रेल्वेच्या मुंबईच्या उपनगरी नेटवर्कमध्ये 8 अतिरिक्त उपनगरी सेवा सामील करण्यात आल्या



तारघर



गव्हाण



दिघा गाव

महिला सक्षमिकरण



माटुंगा रेल्वे स्थानक

माटुंगा रेल्वे स्थानक हे भारतातील पहिले स्थानक आहे जे फक्त महिला कर्मचारी चालवतात. स्थानकात एकूण 31 महिला कर्मचारी काम करतात, यात 1 स्टेशन मॅनेजर, 14 बुकिंग क्लार्क, 2 पॉइंट्स विमेन, 8 तिकिट तपासनीस (TC) कर्मचारी, 3 ऑपरेटिंग कर्मचारी आणि 3 रेल्वे सुरक्षा बलाच्या जवान आहेत.



नवीन अमरावती – सर्व महिला कर्मचारी असलेले स्थानक.

नवीन अमरावती स्थानक 19 महिला कर्मचाऱ्यांद्वारा चालवण्यात येत आहे, त्यात 4 स्टेशन मॅनेजर, 4 महिला RPF जवान, 3 गेटविमेन, 3पॉइंट्सविमेन, 1 बुकिंग क्लार्क, आणि 4 S&T कर्मचारी आहेत.



अजनी स्थानक - सर्व महिला कर्मचारी असलेले स्थानक.

अजनी स्थानक 20 महिला कर्मचारी चालवतात, यात 1 स्टेशन मॅनेजर, 1 चीफ बुकिंग सुपरवायझर, 4 कमर्शियल क्लार्क, 4 तिकिट चेकिंग कर्मचारी, 2 पॉइंट्सविमेन 6 RPF जवान, 1 SSE, आणि 1 MCM आहेत.



याशिवाय पश्चिम रेल्वेचे माटुंगा स्थानकही महिला कर्हचारीच चालवतात.



मुंबई – साईनगर शिर्डी वंदे भारत मध्ये कार्यरत सर्व महिला कर्मचारी



महिला सबलीकृत टीम अहिल्या व दुर्गा. माटुंगा वर्कशॉपमध्ये सर्व महिलांची वेल्डिंग टीम यांची कौशल्ये आणि शक्ती महिला सबलीकरणाची आदर्श उदाहरणे असून त्या सर्वांना प्रेरणा देतात.



छत्रपती शाहू महाराज टर्मिनस, कोल्हापूर – पुणे वंदे भारत




लोणावळा आणि कर्जत यांच्यामध्ये बोरघाटाच्या शेवटच्या वळणावर 12124 दख्खनची राणी एक्सप्रेस भर वेगात मुंबईकडे जाताना.

नवीन रेल्वे सेवा

महाराष्ट्रातील १२ वंदे भारत रेल्वे

ज्या महत्त्वाच्या राज्यांना ,प्रदेशांना जोडतात



१२ वंदे भारत एक्सप्रेस

- नागपूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई-साईनगर शिर्डी
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई-सोलापूर
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई-मडगाव
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई – हुजूर साहिब नांदेड
- नागपूर - बिलासपूर
- नागपूर - इंदौर
- अजनी - पुणे
- नागपूर - सिकंदराबाद
- पुणे - हुबळी
- छत्रपती शाहू महाराज टर्मिनस, कोल्हापूर - पुणे
- मुंबई सेंट्रल - अहमदाबाद
- मुंबई सेंट्रल - गांधीनगर



5 अमृत भारत एक्सप्रेस

- लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई - सहरसा
- मुंबई (पनवेल) - अलिपूरद्वार
- उधना - ब्रह्मपूर
- मुझफ़्फ़रपूर-चारियापल्ली
- इरोड - जोगबनी

अत्याधुनिक सुविधा



व्हिस्टा डोम कोच

- रुंद खिडक्या
- पारदर्शक छत
- प्रवासी बाहेरची सुंदर निसर्गदृश्ये सतत बघत राहू शकतात.
- LED दिवे
- फिरत्या आणि पुशबॅक खुर्च्या
- GPS आधारित माहिती प्रणाली
- अनेक टीव्ही स्क्रीन्स
- दिव्यांगांसाठी ऑटोमॅटिक स्लाइडिंग डोअर्स
- सिरॅमिक टाईल्ससहित स्वच्छतागृहे इ.
- सात प्रतिष्ठित ट्रेन्समध्ये सुरु करण्यात आल्या:

(I) 12009/12010 मुंबई सेंट्रल - अहमदाबाद जंक्शन. शताब्दी एक्सप्रेस

(II) 11007/11008 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई--पुणे डेक्कन एक्सप्रेस

(III) 12051/12052 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई-मडगांव जनशताब्दी आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई जनशताब्दी

(IV) 22119/22120 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई-मडगांव तेजस एक्स्प्रेस (V) 12123/12124 छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई-मडगांव तेजस एक्सप्रेस

(VI) 12125/12126 सीएसएमटी-पुणे प्रगती एक्सप्रेस (VII) 12024/12026 पुणे-सिकंदराबाद जं. शताब्दी एक्सप्रेस आणि पुणे शताब्दी एक्सप्रेस.

हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्शन (HABD)

- ही एक स्वयंचलित वेसाईड डिटेक्शन सिस्टिम आहे जी ॲक्सल बॉस बेअरिंग्ज, व्हील रिम/डिस्क आणि ब्रेक डिस्क्स यांच्या तापमानाचे निरीक्षण करून हॉट ॲक्सल बॉक्सेस आणि लॉक्ड व्हील्स शोधून काढते.
- वापरकर्ता विविध पातळ्यांवर अलार्म सेट करू शकतो.
- ही प्रणाली व्हील, ॲक्सल बॉक्स आणि ब्रेक डिस्कचे तापमान मोजू शकते.
- हा शोध प्रत्यक्ष वेळेवर घेता येतो.
- HABD हे संपूर्ण मध्य रेल्वे क्षेत्रात 73 जागी बसवण्यात आले आहे (मुंबईमध्ये 12, पुण्यात 11, सोलापूरमध्ये 14, भुसावळमध्ये 17 आणि नागपूर विभागात 19).



पॉइंट मशीन

सर्वोत्तम नावीन्य अविष्काराचा पहिला पुरस्कार मध्य रेल्वेने मिळवीला, तो "पाण्याखाली असताना पॉइंट मशीनची नादुरुस्ती रोखण्यासाठी नावीन्यपूर्ण उपाय" साठी हा पुरस्कार देण्यात आला. पावसाळ्यामधे उपनगरी सेवा चालू ठेवण्यासाठी हा एक महत्वाचा उपक्रम आहे. विशेषतः पावसाळ्यात पाण्याखाली असताना पॉइंट मशीन नादुरुस्ती होत होती, त्यावर एक उपाय शोधण्यासाठी मध्य रेल्वेने केलेल्या अथक प्रयत्नांच्य कौतुकासाठी हा मानाचा पुरस्कार देण्यात आला.



प्रवाशांच्या सुखदायकतेमध्ये नावीन्यपूर्ण आविष्कार

जन औषधी केंद्र लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई येथे



एक स्थानक एक उत्पादन



पुणे येथे फिरते उपहारगृह



नागपूर येथे डिजिलॉकर



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे UTS सहाय्यक



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे रिलॅक्स झोन




डिजिटल उपक्रम

हॅण्ड हेल्ड टर्मिनल्स



पर्यावरणपूरक उपाय असलेल्या हॅंड हेल्ड टर्मिनल्सने ऑन-बोर्ड TTEs वापरत असलेल्या पेपर चार्ट्सची जागा घेतली आहे. TTEs सहजपणे प्रवाशांची तिकिटे तपासतात, उपस्थित/अनुपस्थित प्रवाशांच्या पुढे खुणा करतात आणि नवीन/अल्टरनेट बर्थ किंवा सीटची वितरण करतात. शिवाय जागांचे अपग्रेडेशन, डाऊनग्रेडेशन, भोजन आणि बेड रोल्ससाठीचा हिशोब व्यवस्थित करता येतो.

यात्री ॲप



ट्रेन्सचे अचूक लाईव्ह अपडेट्स, पुढील किंवा मागील स्थानके कोणती होती त्यांची स्थाने, अ ते ब कम्युट प्लॅनिंग, 'शेअर ॲंड कॉंट्रिब्यूट" आणि इतर अनेक उपयुक्त वैशिष्ट्यांच्या बाबतीत वापरकर्त्यासाठी सहजसोपा अनुभव देते, शिवाय तिकिटे बुक करण्यासाठी UTS ॲपसोबत जोडलेले आहे.

रेलवन ॲप

फायदे:

- क्यू-लेस आणि पेपरलेस तिकिट
- R-Wallet रिचार्जवर 3% जादा बोनस मिळवा
- ऑर्डिनरी/मेल/एक्सप्रेस/सुपरफास्ट/वातानुकुलीत ईएमयू/अंत्योदय साठी उपलब्ध
- प्रथम वर्ग/ वातानुकुलीत ईएमयू साठी एकाच एंट्रीवर 4 पर्यंत प्रवाशांची तिकिटे बुक करता येतात






607 स्थानकांवर मोफत Wi-Fi सुविधा

प्रवाशांसाठी सुविधा


सरकत्या जिन्यांची सुविधा





- सरकते जीने - 2004-14 = 16
- सरकते जीने - 2014-26 = 359

लिफ्टची सुविधा



- लिफ्ट - 2004-14 = 4
- लिफ्ट - 2014-26 = 307



प्रवाशांसाठी सुविधा

बेबी फीडिंग रूम



अकोला येथील बेबी फीडिंग रूम

सलून



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथील व्यावसायिक सलून

प्रवाशांच्या सोयीसाठी चिन्हे



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई रेल्वे स्थानकावर मोठ्या फॉंट्समध्ये चिन्हे


जल शुद्धीकरण युनिट



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई रेल्वे स्थानकावर अत्याधुनिक अल्ट्रा-फिल्ट्रेशन मेम्ब्रेन-आधारित जलशुद्धीकरण युनिट

प्रवाशांसाठी सुविधा

LED प्रकाशव्यवस्था (स्थानकांची संख्या)






छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई
येथे LED प्रकाशव्यवस्था

- LED प्रकाशव्यवस्था-2004-14 = 0
- LED प्रकाशव्यवस्था-2014-26 = 816



कळवा येथील पादचारी पूल

पादचारी पुलांची व्यवस्था



- पादचारी पुल - 2004-14 = 143
- पादचारी पुल - 2014-26 = 432

पर्यावरणपूरक उपक्रम

BEE द्वारे ऊर्जेच्या खपावर आधारित बिल्डिंग लेबलिंग कार्यक्रम

ब्यूरो ऑफ एनर्जी एफिशियन्सी (BEE) ने नेट झिरो एनर्जी बिल्डिंग्ज (NZEB) आणि नेट पॉझिटिव्ह एनर्जी बिल्डिंग्ज (NPEB) असा बिल्डिंग लेबलिंग कार्यक्रम आखला आहे. त्याला "शून्य" लेबलिंग कार्यक्रम म्हणतात.

1) शून्य: नेट झिरो एनर्जी बिल्डिंग जी दर वर्षी जितकी पुन: निर्मितीक्षम ऊर्जा खर्च करते, तितकी पुन: निर्मिती ऊर्जा ती निर्माण करते.

2)शून्य+: एक एनर्जी-पॉझिटिव्ह बिल्डिंग जी जितकी पुन: निर्मिती ऊर्जा खर्च करते, त्याहून अधिक पुन: निर्मिती ऊर्जा निर्माण करते, राहिलेली ऊर्जा ती ग्रिडकडे पाठवून देते.

क्षेत्रीय रेल्वे प्रशिक्षण केंद्र, भुसावळ हे मध्य रेल्वेमधील पहिले युनिट आणि भारतीय रेल्वेमधील 7 वे युनिट आहे ज्याला शून्य प्लस मिळाले, म्हणजेच ब्यूरो ऑफ एनर्जी एफिशियन्सी (BEE), ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून नेट पॉझिटिव्ह एनर्जी स्टेटस मिळाले.

EMU वर्कशॉप सानपाडा (POH) ने जून 24 मध्ये BEE चे शून्य प्लस लेबल मिळवले आहे. BEE चे शून्य प्लस लेबल मिळवणारे हे भारतीय रेल्वे मधील पहिले वर्कशॉप आहे.

21 इमारतींना नेट पॉझिटिव्ह एनर्जी आणि नेट झिरो एनर्जी उपक्रमांसाठी शून्य प्लस आणि शून्य लेबल" बहाल करण्यात आले आहेत. या 21 इमारती अशा आहेत:

- BEE शून्य प्लस: ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डिंग क्षेत्रीय रेल्वे प्रशिक्षण केंद्र, भुसावळ, स्थानक सर्व्हिस बिल्डिंग - पाचोरा; RPF ऑफिस – मूर्तिजापुर; RRI बिल्डिंग – अमरावती; स्टेशन सर्व्हिस बिल्डिंग – अमरावती; EMU वर्कशॉप, सानपाडा (POH); रुकडी स्थानक; सानपाडा कारशेड; अरग स्थानक.

- BEE शून्य: सीनियर सेकंडरी रेल्वे स्कूल – भुसावळ; हेल्थ युनिट – शेगाव; हेल्थ युनिट – मूर्तिजापूर; हेल्थ युनिट – बडनेरा, नांद्रे स्थानक; भिलवडी स्थानक, जयसिंगपूर स्थानक; रेल्वे हॉस्पिटल – बल्हारशाह; हेल्थ युनिट आमला; चितोडा रेल्वे स्थानक; हेल्थ युनिट/नाशिक; हेल्थ युनिट – खंडवा.



इगतपुरी येथे सौर ऊर्जायुक्त छत



सानपाडा येथे सौर ऊर्जायुक्त छत

विद्युतीकरणाची 100 वर्षे





छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे विद्युतीकरणाची 100 वर्षे पूर्ण झाली त्यासाठी प्रदर्शन ठेवण्यात आले

स्वच्छ रेल - स्वच्छ भारत



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे यांत्रिक साफसफाई



वंदे भारत मध्ये साफसफाई

महिला सुरक्षा



महिला सुरक्षेसठी महिला रेल्वे सुरक्षा आरक्षणाची तैनाती



महिला सुरक्षेसाठी उपनगरी गाड्यांमधील महिलांच्या डब्यांमध्ये इमर्जन्सी टॉक बॅक सिस्टिम बसवली

रोजगार संधींची निर्मिती

BRIEF: मराठवाडा रेल कोच फॅक्टरी, लातूर

- या कोच उत्पादन कारखान्याचा प्रस्ताव 2018 मध्ये मांडण्यात आला आणि अनुदानांच्या पुरवणी मागण्यांच्या अंतर्गत त्याला 2018-19 मध्ये रु. 492.73 कोटी खर्चासह मान्यता मिळाली.
- टप्पा-I मध्ये, या कारखान्याचे बांधकाम करण्यात आले असून त्याची क्षमता दर वर्षी 250 MEMU कोचेस उत्पादित करण्याची आहे.
- 2022/RS(WTA)-527/वंदे भारत करारानुसार या कारखान्याचा उपयोग टेक्नॉलॉजी पार्टनर हा भारतीय रेल्वेला पुरवठा कार्यक्रमानुसार 120 वंदे भारत ट्रेन सेट्स (16 डबे प्रत्येकी) बनवून देण्यासाठी करेल.

प्रकल्पातील ठळक मुद्दे

- प्रकल्पाचा खर्च: रु. 675.79 कोटी
- टप्पा-I मध्ये, 351 एकरांपैकी 110 एकरांवर बांधकाम करण्यात आले आहे, यात 24 एकर निवासी क्षेत्र येते.
- बिल्ट-अप एरिया: 95653 (m^2) चौ. मीटर
- प्री-इंजीनियर्ड बिल्डिंग शेड्स: 56,500 चौ मी, विविध शॉप्ससाठी
- सर्व शॉप्समध्ये अद्ययावत यंत्रे व सामुग्री.
- भविष्यातील प्रमाण वाढीसाठी भरपूर जागा आहे





फायदे:

रेल्वेला फायदे

- हा कारखाना अत्याधुनिक तंत्रज्ञानासह आणि प्रवासी सुविधांसह भारतीय रेल्वेसाठी कोचेस बनवण्यासाठी एक टेक्नॉलॉजी पार्टनर वापरेल.
- त्याच वेळी रेल्वे कर्मचाऱ्यांची क्षमता वाढवली जाईल कारण कोचेस बनवत असतानाच त्यांनाही टेक्नॉलॉजी पार्टनर प्रशिक्षण देऊन काम करून घेईल.



प्रशासकीय इमारत

स्थानिक पातळीवर फायदे:

- संपूर्ण मराठवाड्याचा विकास होईल कारण या कारखान्याला विविध सुटे भाग पुरवण्यासाठी संपूर्णपणे नवीन उत्पादक/विक्रेते येथे येतील.
- आधीच प्रस्थापित असलेल्या MSMEs चा विकास त्यांच्या क्षमतावर्धनामार्फत होईल कारण त्यांना या कारखान्याला उत्तम गुणवत्तेचे सुटे भाग पुरवण्याची संधी मिळेल.
- टप्पा-I मध्ये सुमारे 1100 लोकांना (200 रेल्वे कर्मचारी समाविष्ट) थेट रोजगार मिळेल.
- सुरक्षा, हाऊसकीपिंग, लॅंडस्केपिंग, लॉजिस्टिक्स इ. काम बाहेर दिली गेल्यामुळे लक्षणीय प्रमाणात अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती.
- वसाहतीतील रहिवाशांमुळे आसपासच्या भागांमध्येही अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती.



रेल्वे वसाहत

पर्यावरणाला फायदे:

- 7 टक्के छत आणि बाजूच्या भिंतीसाठी प्री-इंजिनियर्ड पॉलिकार्बोनेट शीट्स वापरणार, त्यामुळे 300 लक्स पर्यंत नैसर्गिक प्रकाश पुरवला जाईल.
- टर्बो रूफ-व्हेंटिलेटर्स वापरल्यामुळे ग्रीन बिल्डिंग मानके पूर्ण होणार.
- 817 kWp रूफ टॉप सौर ऊर्जा प्लॅंट बसवण्यात आला.
- सर्व मटेरियल हॅंडलिंग सामुग्री (फोर्कलिफ्ट, रेल कम रोड व्हेईकल, रीच ट्रक) बॅटरीवर चालणार, त्यामुळे कार्बन निर्मिती कमी होणार.
- कारखाना व वसाहतीतील सांडपाण्याच्या प्रक्रियेसाठी 75 केएलडी क्षमतेचा प्लॅंट.

एक स्थानक एक उत्पादन

223 स्थानकांमध्ये 234 स्टॉल

भरतीय रेल्वेच्या एक स्थानक एक उत्पादन (OSOP) या योजनेचा संपूर्ण देशामध्ये स्थानिक कलाकुसरीला उत्तेजन देण्यासाठीचे आणि अगदी निम्नस्तरावरील उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ म्हणून उदय झाला आहे. या उपक्रमाचा उद्देश रेल्वे स्थानकांचे भारताच्या समृद्ध प्रादेशिक सांस्कृतिक वैविध्याचे प्रदर्शन करण्यासाठीचे एक स्थान म्हणून करणे हा आहे. स्थानिक वारशाची राष्ट्रीय रेल्वे नेटवर्कमध्ये गुंफ़ण करून OSOP प्रवाशांचा अनुभव समृद्ध करते, शिवाय सर्वसमावेशक आर्थिक प्रगतीला सहाय्य करते.



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई

31 मार्च 2026 पर्यंत महाराष्ट्रात 223 स्थानके OSOP योजनेत आली आहेत व त्यांमध्ये एकूण 234 विक्री केंद्रे आहेत.

याशिवाय 2022 मध्ये OSOP सुरू केल्यापासून एकट्या मध्य रेल्वेमध्ये या उपक्रमाने 3643 हून अधिक लाभार्थींसाठी आर्थिक संधी निर्माण केल्या आहेत.



दादर

- यामुळे सरकारच्या "व्होकल टु लोकल" ला उत्तेजन मिळेल व स्थानिक "विश्वकर्मा" लोकांना दूरदूरच्या प्रदेशांमध्ये विक्री करता येईल.
- स्थानिक कुंभार, सुतार, शिल्पकार, चांभार, शिंपी, विणकर, लोहार आणि स्थानिक हस्तकलाकारांना एक व्यासपीठ मिळेल.
- स्थानिक आणि पारंपरिक उत्पादनांचे प्रदर्शन, विक्री आणि दूरदूरच्या प्रदेशांमध्ये दर्शन होईल.
- पारंपरिक आणि स्थानिक कलांना उत्तेजन मिळायला मदत होईल आणि देशातील पारंपरिक अर्थव्यवस्थेला मोठे उत्तेजन मिळेल.
- OSOP विक्री केंद्रांची संरचना नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन, अहमदाबाद येथे केली आहे, ज्यामुळे संपूर्ण भारतीय रेल्वेमध्ये ही केंद्रे एकसमान असतील.
- महाराष्ट्रात रेल्वे स्थानकांवरील OSOP विक्री केंद्रांवर ठेवलेल्या विविध उत्पादनांमध्ये समाविष्ट आहेत अहमदनगर येथे केळी, द्राक्षे, पापड, लोणची, बडनेरा येथे सांबारवडी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे चामड्याच्या वस्तू, चिंचवड येथे घरगुती अगरबत्ती, धूप, साबण, फिनाईल चर्चगेट येथे चामड्याच्या वस्तू, गोरेगाव येथे खादी उत्पादने, इगतपुरी येथे मोसमी फळे आणि खाद्य पदार्थ जसे पपया, द्राक्षे, सफरचंदे, लोणची, पापड इ., कोल्हापूर येथे हातांनी बनवलेल्या कोल्हापुरी चपला. कणकवली व कुडाळ येथे लाकडी खेळणी, लोणावळा येथे चिक्की व फज उत्पादने, नाशिक रोड येथे पैठणी साड्या, पंढरपूर येथे श्री विठठलाच्या मूर्ती, कुंकू, अगरबत्ती, आणि इतर पूजा साहित्य, नागपूर येथे बांबू उत्पादने, परळ येथे कपडे आणि हॅंडलूम उत्पादने, पिंपरी येथे हातांनी बनवलेल्या पर्स बॅग (कागद व कापडापासून), सातारा येथे कंदी पेढे, शेगाव येथे पापड, सोलापूर येथे सोलापुरी चादरी, बेडशीट्स आणि टॉवेल्स, बोरिवली येथे वार्ली कलाकुसरीच्या वस्तू, वसई रोड व नालासोपारा येथे सॉफ्ट टॉईज, इ.


कलबुरगि


कोल्हापूर


नागपूर


पंढरपूर

मालवाहतुकीसंबंधित उपक्रम

मालवाहतुकीच्या वाहतुकीसाठी नवीन टर्मिनल्स



लोखंड व स्टील लोडिंग

प्रायव्हेट साइडिंग

- द्रोणागिरी रेल टर्मिनल
- मे. विदर्भ इंडस्ट्रीज लि,
- मे. नायरा एनर्जी लि.
- मे. औट्राटेक सिमेंट साइडिंग
- मे. पेन्ना सिमेंट इंडस्ट्रीज लि.
- मे. BPCL प्रायव्हेट साइडिंग
- चेट्टिनाड सिमेंट कं. लि./तिलाटी
- झुआरी सिमेंट साइडिंग/तिलाटी
- नॅशनल थर्मल पॉवर प्लॅंट (NTPC)/होटगीं



कोळसा वाहतूक

गती शक्ती मल्टि मोडल कार्गो टर्मिनल्स (GCTs)

- मे. रिलायन्स सिमेंट कं. प्रा. लि. -RGTM
- मे. जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्स लि. - JCSK
- नागपूर MMLP GCT - NLGS
- म. नवकार कॉर्पोरेशन लि. - PNCS
- अदानी ॲग्रो लॉजिस्टिक्स लि. - PATP
- श्री सिमेंट लि. SCGP
- मे. BPCL हिरेनांदुरू - BPGH
- मे. फ्युएलको वॉशरीज (इंडिया) लि. - FWSM
- दिनेश OCM मकरढोकरा - III
- मुंगोली-निरगुडा OC कोल माईन्स



फ्लाय ॲश भरलेला रेक

प्रायव्हेट फ्रेट टर्मिनल

- मे. अदानी लॉजिस्टिक्स प्रा. लि. (PALB)
- मे. डिस्ट्रिब्युशन लॉजिस्टिक्स इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. (DLIB)
- मे. मल्टि मोडल लॉजिस्टिक्स (PCPK)
- मे. मॅरिटाईम सर्व्हिसेस प्रा. लि. - (PPDP)
- मे. सेंट्रल वेअरहाउसिंग कॉर्पोरेशन (MILK)
- मे. उत्तम व्हॅल्यू स्टील लि. (B/PFT)
- मे. विमला इंडस्ट्रीज प्रा. लि. (B/PFT)



वणी गुड्स शेडमध्ये डोलाईटचे लोडिंग

प्रायव्हेट गुंतवणुकीसह गुडशेड्सचा विकास

- कळंबोली
- जळगाव
- बुटीबोरी

मालवाहतुकीसंबंधित उपक्रम

खास कंटेनर रेल टर्मिनल्स

- रोहा कंटेनर टर्मिनल
- उरण कंटेनर टर्मिनल



- महाराष्ट्रातील मालवाहतुकीमध्ये रेल्वेने नेहमीच एक महत्वाची भूमिका बजावली आहे.
- रेल्वेच्या विविध स्तरांवरील व्यवसाय विकास युनिट्सच्या सतत प्रयत्नांमुळे माल वाहतुकीत नवीन वाहतुक आणि वस्तूंची भर पडली आहे.

- कोळसा
- अन्नधान्ये
- कांदा
- फर्टीलायझर
- डि-ऑईल केक
- कंटेनर
- किरकोळ वस्तू
- वाहने
- पोलाद
- साखर
- पेट्रोलियम उत्पादने
- सिमेंट
- रो-रो
- लोह खनिज
- लोह खनिजाची पेलेट्स
- बॉक्साईट
- बाभळीचा गर



साखर वाहून नेणारा रेक



कंटेनर वाहून नेणारा रेक



वाहनांचे लोडिंग



कांद्याचे लोडिंग

भारत गौरव ट्रेन

IRCTC ची भारत गौरव टूरिस्ट ट्रेन टूर भारत सरकारच्या एक भारत श्रेष्ठ भारत या उपक्रमांतर्गत, रेल्वे मार्गाने विशिष्ट विषयाधारित पर्यटनाला भारतभरात प्रोत्साहन देण्यासाठी चालवली जाते. या ट्रेन्स म्हणजे फिरते मार्ग आहेत जे भारताचा समृद्ध सांस्कृतिक, धार्मिक वारसाचे दर्शन घडवतात भाविक आणि पर्यटकांना आरामदायक, सर्वसमावेशक प्रवासांमधून दर्शन घडवण्यासाठी या तयार केलेल्या असतात, आणि ते महत्वाची सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि वारशाची स्थाने दाखवतात.


09.03.2023 रोजी महाराष्ट्रातील पुण्यामधून पहिल्या भारत गौरव ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला, तेव्हापासून IRCTC ने महाराष्ट्रातील विविध स्थानकांवरून अशा 51 सफरी घडवून आणल्या आहेत आणि त्यामधून 30000 हून अधिक प्रवाशांनी प्रवास केला आहे.

अलिकडच्या काळात मुंबईच्या IRCTC पश्चिम विभागाने त्याचा भारत गौरव टूरिस्ट ट्रेनचा आवाका लक्षणीय प्रमाणात वाढवला आहे; अनेकविध स्थानकांवरून सुटणाऱ्या गाड्यांमधीन नवीन ठिकाणे पाहण्यासाठी त्यांनी नवीन योजना सुरू केल्या आहेत. पूर्वी ट्रेन्स मुख्यतः मुंबई, पुणे, कोल्हापूर आणि सोलापूरवरून सुटत होत्या. आता या नेटवर्कमध्ये मनमाड, नाशिक, भुसावळ, आणि मडगाव येथूनही ट्रेन्स सुटतात त्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणच्या नागरिकांना त्या सोयिस्कर झाल्या आहेत. ट्रेन्स सुटण्याच्या नवीन ठिकाणांबरोबर IRCTC कोटा, मुरूडेश्वर, गुरुवायूर, कांचीपुरम, महाबलीपुरम, खाटु श्यामजी, कुरुक्षेत्र, लखनौ आणि कामाख्या, इ. नवीन स्थळेही समाविष्ट केली आहेत, ज्यामुळे हे मार्ग आध्यात्मिक, सांस्कृतिक, आणि ऐतिहासिक अनुभवांनी अधिक समृद्ध झाले आहेत. ट्रेन सुटण्याची ठिकाणे आणि गंतव्य स्थळे अशा दोन्हीमध्ये विविधता आणून IRCTC ने कल्पकतेने सर्वसमावेशक टूर पॅकेजेसद्वारे सर्वसमावेशक आणि सोयिस्कर प्रवासाचे पर्याय निर्माण केले आहेत. या विस्तारामुळे देशांतर्गत पर्यटनाला प्रोत्साहन मिळून देशभरात विषयाधारित प्रवासांना असलेली वाढती मागणी पूर्ण करण्याचे प्रयत्न अधोरेखित होत आहेत.


भारत गौरव ट्रेनने दक्षिण दर्शन







महाराष्ट्रातील डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर प्रकल्पाचा तपशील



i. स्थान: पालघर-सफाळे-खारबाव-निळजे-जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट

ii. महाराष्ट्रातील मार्गाची लांबी: 178 किमी (WDFC पैकी 12 %) आणि (संपूर्ण DFC 2843 किमी) 6.2 %

iii. अंतर्भूत जिल्हे: पालघर, रायगड व ठाणे

iv. ताब्यात घेतलेली जमीन: 444 हेक्टर

v. गुंतवणूक: रु. 7,600 कोटी (जमीन-1941 कोटी.,

प्रकल्प- 5738 कोटी.)

vi. बांधकाम खर्च: रु. 32.23 कोटी, प्रति ट्रॅक किमी

vii. मार्गावरील ओव्हरब्रिजेस (ROBs): 20 (15 पूर्ण)

viii. मार्गाखालून जाणारे पूल (RUBs): सर्व 18 RUB पूर्ण

ix. रेल्वे फ्लायओव्हर (RFOs): 04 (3 पूर्ण)

x. कार्यान्वित मार्ग:

a. न्यू उंबरगाव रोड- न्यू वैतरणा – 76 मार्ग किमी

xi. पूर्ण करण्याचे उद्दिष्ट: जून 2026

xii. स्थानके: 5

- जंक्शन स्थानके: 4 (न्यू सफाळे, न्यू खारबाव, न्यू निळजे, न्यू जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट)
- क्रॉसिंग स्थानके: 1 (न्यू पालघर)

xiii. खासगी माल वाहतुक टर्मिनल्स (PFTs): निर्माणाधीन.

xiv. मल्टिमोडल लॉजिस्टिक्स पार्क्स: निर्माणाधीन.

xv. मालाची टर्मिनल्स (GCT पॉलिसी अंतर्गत): 3 स्थाने: (मुरबे बंदर, न्यू खारबाव, न्यू निळजे)

xvi. WDFC व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट यांमधील कनेक्टिव्हिटीमुळे बंदर ते दिल्ली NCR दरम्यान माल आणि कंटेनरची वाहतूक हाताळण्याची क्षमता वाढेल.

xvii. रेल कनेक्टिव्हिटी प्रकल्प:

- प्रायव्हेट साइडिंग्ज
- बंदर

xviii. फीडर मार्ग:

i. मुंबई बंदर-वडाळा-कुर्ला-दिवा 36 किमी

ii. पनवेल-पेण-रोहा 75 किमी

तंत्रज्ञानातील प्रगती



रेल संरक्षा आणि भविष्यातील चलनक्षमता वाढवण्यासाठी नवीन इंटरलॉकिंग सिस्टिमकडे प्रवास



भारतीय बनावटीच्या ऑटोमॅटिक ट्रेन प्रोटेक्शन सिस्टिम कवच बसवण्यात आले



मुंबई उपनगरी नेटवर्कवर ट्रेन व्यवस्थापन प्रणाली



कवच

प्रवाशांसाठी सुविधा

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे ब्रेल लिपीतील नकाशा



वातानुकुलीन प्रतीक्षालय



रेल्वे सुरक्षा बल मदतकक्ष



बेस किचन



छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई वारसा इमारत: सामाजिक बांधिलकी आणि जाणिवेचे दीपगृह





UNESCO ने मान्य केलेली जागतिक वारसा असलेली छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई ची इमारत हे स्थापत्यकलेच्या भव्यदिव्यत्वाचे एक उदाहरण आहे. राष्ट्रीय व सामाजिक महत्वाच्या प्रसंगी त्याच्यावर प्रकाशझोत टाकले जातात, ज्याद्वारे सामाजिक जबाबदारी आणि सामाजिक जाणीव यांना उत्तेजन देण्यासाठी त्याची बांधिलकी प्रतिबंधित होते.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई चे वस्तुसंग्रहालय हे कर्करोग आणि थॅलासिमिया यांच्यासाठी उपचार घेणाऱ्या बालकांच्या, तसेच दिव्यांग बालकांच्या भेटी आयोजित करून आशेचा किरण प्रज्वलित करते.





भारतीय रेल्वे

Follow us:

www.crindianrailways.gov.in